लोकमत

# सिनेट निवडणुकीसाठी ४० हजार मतदार

## शिवाजी विद्यापीठाकडून अंतिम यादी प्रसिद्ध

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट), विद्या परिषद या अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी दि. १४ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. त्यासाठीची अंतिम मतदार यादी बुधवारी सायंकाळी प्रशासनाने प्रसिद्ध केली. निवडणुकीसाठी ४०,६०० मतदार पात्र ठरले आहेत. त्यामध्ये पदवीधर गटातील ३६,३४३ मतदार आहेत. या निवडणुकीची अधिसूचना शुक्रवारी प्रसिद्ध झाल्यानंतर उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. २८ ऑक्टोबरपर्यंत मुदत आहे.

या दुरुस्त मतदार यादीमध्ये नोंदणीकृत पदवीधर गटातून ३६,३४३ मतदार पात्र ठरले होते. या दुरुस्त यादीवर कुलगुरूंकडे एकूण २५ हरकतींची नोंद झाली. त्यात कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, प्राचार्य, अभ्यास मंडळाच्या यादींमध्ये मतदार म्हणून नावे समाविष्ट करण्याची मागणी केली आहे. या हरकतींवर शुक्रवारी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या उपस्थितीत सुनावणी झाली. त्यातील निर्णयानुसार कार्यवाही करून विद्यापीठ प्रशासनाने अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली.

### या जागांसाठी होणार निवडणूक

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम अन्वये ६ व्यवस्थापन प्रतिनिधी, १० महाविद्यालयीन अध्यापक (प्राध्यापक), ३ विद्यापीठ अध्यापक आणि १० नोंदणीकृत पदवीधर अधिसभेवर, विद्यापीठ आणि महाविद्यालयीन अध्यापकांमधून ८ व्यक्ती विद्या परिषदेवर, प्रत्येक अभ्यास मंडळावर ३ महाविद्यालयीन विभागप्रमुख या निवडणुकीद्वारे भरण्यात येणाऱ्या जागांसाठी मतदान होणार आहे.

### गटनिहाय पात्र मतदार

पदवीधर : ३६३४३, महाविद्यालयीन शिक्षक : २९४५, महाविद्यालयीन विभागप्रमुख : ९३७, विद्यापीठ शिक्षक : १६६, व्यवस्थापन प्रतिनिधी : ११६, प्राचार्य : ९३

पुढारी

# स्पर्धा परीक्षेसाठी उद्यापासून मुलाखती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा केंद्राच्या वतीने २८ सप्टेंबरला घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षेची जनरल मेरीट यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ठेवण्यात आलेली असून २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश परीक्षेतून गुणवत्तेच्या आधारे उपलब्ध जागेप्रमाणे विद्यार्थ्यांना दि. १४ व दि. १५ ऑक्टोबरला सकाळी ११.०० वाजता मुलाखतीसाठी बोलावण्यात आले आहे. या मुलाखतीसाठी पात्र विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. मुलाखत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, मानव्यशास्त्र इमारत, शिवाजी विद्यापीठ येथे होणार आहेत, असे केंद्राचे संचालक प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांनी कळविले आहे.

पुढारी

# सिनेट निवडणुकीसाठी अंतिम मतदार यादी जाहीर

## ४० हजारांवर मतदार बजावणार मतदानाचा हक्क

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीसाठी अंतिम मतदार यादी बुधवारी जाहीर झाली. या निवडणुकीसाठी ३६ हजार ३४६ पदवीधर मतदार पात्र झाले असून एकूण मतदार ४० हजार ३१८ इतके आहेत. या मतदारांना १४ नोव्हेंबरला होणाऱ्या अधिकार मंडळाच्या निवडणुकीसाठी मतदानाचा हक्क मिळणार आहे.

शुक्रवारी १४ ऑक्टोबरला निवडणूक सूचना प्रसिद्ध झाल्यानंतर २८ ऑक्टोबरपर्यंच उमेदवारी अर्ज भरण्यास मुदत आहे. या निवडणुका महिन्याभरावर येऊन ठेपल्याने विद्यार्थी, प्राध्यापक, संस्थाचालक, प्राचार्य संघटनांनी निवडणुकीची तयारी सुरू केली आहे.

१४ नोव्हेंबरला होणाऱ्या या निवडणुकीसाठी मतदारांची अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यामुळे आता निवडणूक तयारीला वेग आला आहे. आता विविध संघटना या निवडणुकीसाठी उमेदवारांची चाचपणी करायला सुरुवात केली आहे. ही निवडणूक तिरंगी अथवा बहुरंगी होण्याची शक्यता आहे.

**पात्र मतदार**

पदवीधर मतदार : ३६३४३, शिक्षक मतदार : २९४५, बीओएस महाविद्यालय विभागप्रमुख : ९३७, प्राचार्य मतदारसंघ : ९३, व्यवस्थापक सदस्य, संस्थाचालक मतदार : ११६, विद्यापीठ शिक्षक : १६६, एकूण मतदार : ४० हजार ३१८.

पुण्यनगरी

# विद्यापीठात उद्या प्रशिक्षण शिबिर

**कोल्हापूर :** कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाच्या वतीने शिवाजी विद्यापीठात शुक्रवार, दि. १४ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र स्टार्टअप यात्रा जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबिर व सादरीकरण सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. नावीन्यपूर्ण संकल्पना असणाऱ्या व्यक्तींनी महास्टार्टअप यात्रा या नावाने असलेल्या संकेतस्थळावर नवकल्पना नोंदवून शिबिरात आपला सहभाग निश्चित करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल रेखावार व कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त संजय माळी यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
13 OCT 2022 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ अंतिम मतदार यादी जाहीर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ निवडणूक मतदारांची अंतिम यादी बुधवारी जाहीर झाली. छाननीनंतर ३६ हजार ३४६ पदवीधर मतदार पात्र झाले असून, त्यांना १४ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या अधिकार मंडळासाठी मतदानाचा हक्क मिळणार आहे. शुक्रवार, १४ रोजी निवडणूक सूचना प्रसिद्ध झाल्यानंतर २८ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज भरले जातील.

शिवाजी विद्यापीठ निवडणुकीसाठी २८ रोजी उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख आहे. ३१ रोजी अर्जाची छाननी, १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज माघार, २ नोव्हेंबर सायंकाळी ५ वाजेपर्यंत उमेदवारी अर्जाच्या वैधतेबाबत कुलगुरूंकडे तक्रार करता येईल. ३ नोव्हेंबर रोजी अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध होईल. १४ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदान होईल. १६ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर होईल.

**पात्र अंतिम मतदार यादी**

| | |
|---|---|
| शिक्षक मतदारसंघ | : २९४५ |
| महाविद्यालय विभागप्रमुख | : १३७ |
| प्राचार्य व्यवस्थापक सदस्य | : १३ |
| संस्थाचालक मतदारसंघ | : ११६ |
| विद्यापीठ शिक्षक | : १६६ |
| पदवीधर | : ३६३४३ |

पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या माजी विद्यार्थ्याला रिसर्च एक्सलन्स अॅवॉर्ड

## दिनेश गावडे यांचा आयर्लंडमध्ये डंका

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या डिपार्टमेन्ट ऑफ टेक्नॉलॉजीमधील इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड टेलिकम्युनिकेशन या शाखेचे माजी विद्यार्थी दिनेश गावडे यांना आयर्लंड येथील टिंडल नॅशनल इन्स्टिटय़ूट संशोधन संस्थेत उत्कृष्ट संशोधनासाठीचा रिसर्च एक्सलन्स हा पुरस्कार प्राप्त झाला. गावडे हे सामान्य कुटंबातील, ग्रामीण पार्श्वभूमीचे विद्यार्थी असून त्यांनी डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीतून बी.टेक. ही पदवी त्यांनी प्राप्त केली आहे.

दिनेश यांच्या मूळच्या कष्टाळू स्वभावाला विद्यापीठाच्या संशोधन वातावरणाची जोड मिळाली. बी. टेक.नंतर ते युरोपमधील प्रसिद्ध टिंडल नॅशनल इन्स्टिटय़ूट येथे रिसर्च असिस्टंट म्हणून रुजू झाले. त्यानंतर एम.एस. (बाय रिसर्च) या पदव्युत्तर पदवीसाठी त्यांची निवड झाली. अॅन्टीना डिझायन, वायरलेस सेन्सिग डिव्हायसेस, आर.एफ.आय.सी. हे त्यांच्या संशोधनाचे विषय आहेत. त्यांना इलेक्ट्रॉनिक्स टेलिकम्युनिकेशन शाखा समन्वयक डॉ. एस. बी. चव्हाण, इंटरनॅशनल अफेअर्स सेल डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीचे समन्वयक प्रा. उदय पाटील व स्टाफ यांचे मार्गदर्शन लाभले. संचालक डॉ. एस. एन. सपली यांनी त्यांचे अभिनंदन केले.

सकाळ

# स्टार्टअप यात्रा प्रशिक्षण शिबिर उद्या विद्यापीठात

कोल्हापूर, ता. १२ : महाराष्ट्र स्टार्टअप यात्रा जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबिर व सादरीकरण सत्राचे आयोजन शुक्रवारी (ता. १४) शिवाजी विद्यापीठात केले आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता केंद्राच्या वतीने हे शिबिर होईल.

नावीन्यपूर्ण संकल्पना असणाऱ्या व्यक्तींनी (स्टार्टअप) www.msins.in किंवा www.mahastartupyatra.in या संकेतस्थळावर नवकल्पना नोंदवून शिबिरात आपला सहभाग निश्चित करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल रेखावार व केंद्राचे सहायक आयुक्त संजय माळी यांनी केले आहे. नोंदणीकृत नवकल्पनांचे सादरीकरण करण्यासाठी शुक्रवारी (ता. १४) शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागात (डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी) सकाळी १० वाजता एकदिवसीय जिल्हास्तरीय प्रशिक्षण सत्र होणार आहे. स्टार्टअपच्या नवकल्पना सुचविणाऱ्यांना बक्षीस ही देण्यात येणार आहे.

सकाळ

# ३६ हजार पदवीधर करणार अधिसभेला मतदान

## १४ नोव्हेंबर रोजी मतदान

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा निवडणुकीसाठी अंतिम मतदार यादी आज रात्री उशिरा प्रसिद्ध झाली. यामध्ये ३६,३४३ पदवीधरांची नावे निश्‍चित झाली आहेत. त्याचबरोबर प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी, महाविद्यालयीन शिक्षक यांचीही यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

विद्यापीठाचे संचालन करणाऱ्या अधिसभेची मुदत दोन महिन्यांपूर्वी संपली. त्यानंतर नवे सभागृह अस्तित्वात येण्यासाठी निवडणुकीची घोषणा करण्यात आली. १४ नोव्हेंबरला मतदान तर १६ नोव्हेंबरला मतमोजणी होईल. त्यासाठी पदवीधर आणि विविध गटातील नोंदणीची मुदत संपल्यावर आज मतदार यादी जाहीर केली. ४९ हजार पदवीधरांनी नोंदणी केली होती. त्यातील ३६ हजार ३४३ पदवीधरांची नावे मतदार म्हणून निश्‍चित करण्यात आली. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर यादी पाहण्यास उपलब्ध आहे.

## मतदार यादी अशी


- प्राचार्य - ९३
- व्यवस्थापन प्रतिनिधी - ११६
- विद्यापीठ शिक्षक - १६६
- पदवीधर - ३६,३४३
- महाविद्यालय शिक्षक - २९४५
- महाविद्यालय विभाग प्रमुख - ९३७



13 OCT 2022 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बहुसंख्याकवादाचे लोकशाहीसमोर आव्हान

## श्रीराम पवार; 'भारतीय लोकशाही...'वरील राष्ट्रीय चर्चासत्रात परखड मांडणी




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र विभागातर्फे आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात बोलताना 'सकाळ माध्यम समूहा'चे संपादक संचालक श्रीराम पवार. व्यासपीठावर प्रा. डॉ. प्रकाश पवार, किशोर बेडकिहाळ, डॉ. अशोक चौसाळकर, प्रा. डॉ. गोपाळ गुरू. (मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा)

कोल्हापूर, ता. १२ : 'स्वातंत्र्यानंतर आपण उदारमतवादी लोकशाहीचा स्वीकार केला. यात धर्मनिरपेक्षता, वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्वांना विकासाची समान संधी, वैविध्याचा आदर हे सगळे अपेक्षित होते. मात्र, मंडल-कमंडलच्या राजकारणाने आणलेले वळण, शहाबानो प्रकरण यानंतर देशात बहुसंख्याकवाद बळकट होत गेला. आता सत्ताधारी कोणी असो, बहुलतावादी लोकशाहीसमोर बहुसंख्याकवादाचे आव्हान कायम असणार आहे,'' असे प्रतिपादन 'सकाळ माध्यम समूहा'चे संपादक संचालक श्रीराम पवार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभाग आणि कॉम्रेड दत्ता देशमुख अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात ते आज बोलत होते. 'भारतीय लोकशाही : बहुसंख्याकवादी की बहुलतावादी' हा विषय होता. डॉ. उषा मेहता स्मृती व्याख्यानमालेच्या शृंखलेतील हे चर्चासत्र होते.

राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले. प्रा. नेहा वाडेकर यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. 'इकॉनॉमिक अ‍ॅण्ड पोलिटिकल विकली'चे संपादक प्रा. डॉ. गोपाळ गुरू हे चर्चासत्राच्या पहिल्या सत्राचे अध्यक्ष होते.

या वेळी श्रीराम पवार म्हणाले, 'स्वातंत्र्य मिळाल्यावर नेहरू, पटेल यांच्यासह काँग्रेसमधील नेत्यांनी उदारमतवादी लोकशाहीचा स्वीकार करून धर्मनिरपेक्षता, विज्ञानवाद या मूल्यांवर देशाच्या प्रगतीला दिशा दिली. १९९० पर्यंत या दिशेने आपण जात होतो. त्या वेळी लालकृष्ण अडवानीही आम्ही धर्मनिरपेक्ष आहोत आणि काँग्रेस छद्म धर्मनिरपेक्ष आहे, असे म्हणत होते. आज आम्ही धर्मनिरपेक्ष आहोत, असे म्हणण्याचे कोणी धाडस करीत नाही. १९९० मध्ये मंडलनंतरच्या राजकारणातून जातीचे गठ्ठे तयार झाले. अयोध्येतील राम मंदिर आंदोलनानंतर वरिष्ठ समजल्या जाणाऱ्या जाती ज्यापूर्वी काँग्रेसकडे होत्या, त्या भाजपकडे वळल्या. शहाबानो प्रकरणाने त्याला बळ दिले. ओबीसी वर्गही भाजपकडे गेला. बहुसंख्याकवादाचे आव्हान केवळ राजकीय नाही, याचे भान बहुलतावाद्यांनी ठेवले पाहिजे.''

प्रा. डॉ. गुरू म्हणाले, 'इतिहासाचे सखोल अध्ययन करायला हवे. अभ्यासाअंती भूमिका ठामपणे मांडल्या पाहिजेत, तरच देशात मूल्याधिष्ठित लोकशाही रुजेल.' किशोर बेडकीहाळ म्हणाले, ''मध्यमवर्गाला बहुसंख्याकवाद हवा आहे. तो देशाच्या हिताचा नाही, त्याला विरोध केला पाहिजे.'' डॉ. अशोक चौसाळकर हे दुसऱ्या सत्राचे अध्यक्ष होते. डॉ. सुखदेव उंदरे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. जयश्री कांबळे यांनी आभार मानले.

13 OCT 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवा महोत्सवात विवेकानंद कॉलेजचे वर्चस्व

## महोत्सवात गडहिंग्लजकरांचा चांगला प्रतिसाद : १६ ते १८ ऑक्टोबरला आटपाटीत मध्यवर्ती युवा महोत्सव

प्रतिनिधी
गडहिंग्लज

डॉ. घाळी कॉलेज येथे शिवाजी विद्यापीठाचा जिल्हास्तरीय युवा महोत्सवात कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजचे वर्चस्व दिसून आले. आता शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती युवा महोत्सव आटपाटी (जि. सांगली) येथील बाबासाहेब देशमुख महाविद्यालयात १६ ते १८ ऑक्टोबर अखेर पार पडणार आहे. पहिल्यांदाच झालेल्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात गडहिंग्लजकरांचा चांगला प्रतिसाद दिला आहे. स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात येणार आहे,

**युवा महोत्सवातील अनुक्रमे विजेते असे**

**लोककला** – विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, आक्काताई पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी, व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी.

**लोकनृत्य**– आजरा महाविद्यालय आजरा, दत्ताजीराव कदम महाविद्यालय, इचलकरंजी, कर्मवीर हिरे कॉलेज, गारगोटी.

**मूकनाट्य**– विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, भारती विद्यापीठ, कोल्हापूर, रत्नाप्पा कुंभार कॉलेज, कोल्हापूर.

**नकला**– राजाराम कॉलेज, कोल्हापूर, दत्ताजीराव कदम कॉलेज, इचलकरंजी, डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज, कोल्हापूर.

**मराठी वक्तृत्व**– भोगावती महाविद्यालय, कुरूकली, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.

**हिंदी वक्तृत्व**– विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, न्यू कॉलेज, कोल्हापूर, शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर.

**इंग्रजी वक्तृत्व**– विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, केआयटी कॉलेज, कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**वादविवाद**– डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज, कोल्हापूर, केआयटी कॉलेज, कोल्हापूर, न्यू कॉलेज, कोल्हापूर.

**सुगमगायन**– न्यू कॉलेज, कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**लोकसंगीत वाद्यवृंद**– विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, न्यू कॉलेज, कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**लघुनाटिका**– शिवशाहू महाविद्यालय, सरूड, रत्नाप्पा कुंभार कॉलेज, कोल्हापूर, भारती विद्यापीठ, कोल्हापूर.

**एकांकिका**– शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, दत्ताजीराव कदम कॉलेज, इचलकरंजी, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.

**समूहगीत**– विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, दत्ताजीराव कदम, इचलकरंजी, रत्नाप्पा कुंभार कॉलेज, कोल्हापूर.

**पथनाट्य**– आनंदी कॉलेज, कळबे तर्फे कळे, दूधसागर महाविद्यालय, बिद्री, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.

**प्रश्नमंजूषा**– तात्यासाहेब कोरे इंजिनिअरींग कॉलेज, वारणानगर, डॉ. डी. वाय. पाटील, कोल्हापूर, महावीर कॉलेज, कोल्हापूर

13 OCT 2022 तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ३६,३४६ पदवीधर मतदार ठरले पात्र

## शिवाजी विद्यापीठ निवडणूक : मतदारांची अंतिम यादी जाहीर : शुक्रवारी अर्ज भरण्यास प्रारंभ

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यापीठ निवडणूक मतदारांची अंतिम यादी बुधवारी जाहीर झाली. छाननीनंतर ३६ हजार ३४६ पदवीधर मतदार पात्र झाले असून त्यांना १४ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या अधिकार मंडळासाठी मतदानाचा हक्क मिळणार आहे. तर शुक्रवार, १४ रोजी निवडणूक सूचना प्रसिध्द झाल्यानंतर २८ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज भरले जातील. प्रत्यक्ष मतदानाला अवघा महिनाभर राहिल्याने सर्वच विद्यार्थी, प्राध्यापक, संस्थाचालक, प्राचार्य संघटनांच्या बैठकांनी जोर धरला आहे.

शिवाजी विद्यापीठ निवडणुकीसाठी २८ रोजी उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख आहे. ३१ रोजी उमेदवारी अर्जांची छाननी होणार आहे. १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घ्यावयाचे आहेत. २ नोव्हेंबर सायंकाळी ५ वाजेपर्यंत उमेदवारी अर्जांच्या वैधतेबाबत कुलगुरूंकडे तक्रार करावी. ३ नोव्हेंबर रोजी अंतिम पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द होईल. १४ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत प्रत्यक्ष मतदान होईल. १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणीला सुरूवात होणार असून निकाल जाहीर होईल. पात्र मतदारांची अंतिम यादी जाहीर झाल्याने मतदार कोण आहेत हे निश्चत झाले आहे. परिणामी उमेदवारांना मतदारांपर्यंत पोहचण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अद्याप उमेदवार कोण हे संघटनांनी जाहीर केले नसले तरी काही उमेदवार ठरलेले आहेत, अशी चर्चा शिक्षण क्षेत्रात आहे. उमेदवारी अर्जांच्या छाननीनंतर पात्र उमेदवारांना प्रचार करण्यासाठी अवघे दहा दिवस मिळणार आहेत. त्यामुळे आतापासूनच संघटनांसह इच्छुकांनी प्रचाराला सुरूवात केली आहे. यंदा विद्यापीठ विकास आघाडी, सुटा आणि समविचारी संघटना शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी कृती समितीच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक लढवणार आहे. सध्यातरी तिरंगी निवडणूक होणार असेच चित्र असून, भविष्यात आणखी एखादी संघटना उठून बसली तर बहुरंगी निवडणूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही..

**पात्र उमेदवारांची मतदारसंघानुसार अंतिम मतदार यादी**

| | |
|---|---|
| शिक्षक मतदारसंघ | २९४५ |
| बि. ओ. एस. महाविद्यालय विभागप्रमुख | ९३७ |
| प्राचार्य मतदारसंघ | ९३ |
| व्यवस्थापक सदस्य, संस्थाचालक मतदारसंघ | ११६ |
| विद्यापीठ शिक्षक | १६६ |
| पदवीधर | ३६३४३ |